डॉ. भावना मोहन अडतानी, वैद्यकीय अधिकारी,
<u>गट-अ यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश क्रमांकः स्वेसेनि-२०१९/प्र.क्र.४९१/सेवा-३
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, संकुल इमारत, १० वा. मजला
मंत्रालय, मुंबई-४०० ००१
तारीख: ०७ ऑक्टोबर, २०१९

वाचा :- (१) सहसंचालक (प्रशासन), आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/२ब/डॉ. अडताणी/स्वेसेनि/जा.क्र.४५०/१९, दि.२४ /०९/२०१९.
(२) डॉ. भावना मोहन अडतानी यांची दि. २४.०५.२०१९ व दि. २५.०९.२०१९ ची अर्जे.

शासन आदेश :-

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, वैद्यकीय अधिकारी गट-अ या संवर्गातील (वेतन बँड रु. १५६००-३९१०० + ग्रेड वेतन रु. ५४००) या मध्ये कार्यरत असलेल्या डॉ. भावना मोहन अडतानी, वैद्यकीय अधिकारी, गट-अ, प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा, पुणे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस होऊन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि. ०८.०२.१९९० अन्वये नामनिर्देशनाने नियुक्ती झाली आहे. डॉ. अडतानी, यांनी म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम क्र. ६६ (१) मधील तरतुदीनुसार २० वर्षाची अर्हताकारी सेवा दि. ०८.०२.२०१० रोजी पूर्ण केलेली असल्याने, तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ६६ (५) नुसार डॉ. अडतानी यांनी स्वेच्छा सेवानिवृत्तीची नोटीस विहित कालावधीत मागे न घेतल्याने, म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ६६ (२) नुसार डॉ. अडतानी ह्या आपोआपच स्वेच्छा सेवानिवृत्तीच्या नोटीशीच्या समाप्तीच्या दिनांकास स्वेच्छा सेवानिवृत्त (Deemed to retire) झाल्याचे मानले आहे. डॉ. अडतानी यांनी दि. २४.०५.२०१९ रोजी दिलेल्या स्वेच्छा सेवानिवृत्ती नोटीसीचा तीन महिन्याचा कालावधी दि. २३.०८.२०१९ रोजी पूर्ण होतो. तथापि, त्यांनी सदर नोटीशीमध्ये दि.३०.०९.२०१९ (म.नं.) पासून स्वेच्छा सेवानिवृत्त करण्याबाबत विनंती केली आहे. तसेच डॉ. अडतानी यांनी त्यांच्या दि. २५.०९.२०१९ च्या अर्जान्वये विनंती केल्यानुसार डॉ. अडतानी यांनी दि.२४.०५.२०१९

च्या अर्जान्वये दिलेली स्वेच्छा सेवानिवृत्तीची सूचना स्विकारण्यात आली असून, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम क्रमांक ६६ (१) (२) (५) मधील तरतुदींनुसार डॉ. भावना मोहन अडतानी, वैद्यकिय अधिकारी, गट-अ, ह्या दि. ०१.१०.२०१९ (म.पू.) पासून स्वेच्छेने सेवानिवृत्त झाल्या असल्याचे घोषित करण्यात येत आहे.

२. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१९२२१२३२०३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

UMESH DHARMA RATHOD

Digitally signed by UMESH DHARMA RATHOD
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9d2847c085fbb527b4b95e71ae1457bfffcbb1147b4cb91423f372da97117d29, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=3667a98f6d3e5f0ed5652697d674c2eb05d852dd34f87fda6a20696c80787981, ou=PUBLIC HEALTH DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=UMESH DHARMA RATHOD
Date: 2019.10.07 11:52:59 +05'30'

(डॉ.उमेश ध.राठोड)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
३) उपसंचालक, आरोग्य सेवा पुणे मंडळ, पुणे.
४) जिल्हा शल्यचिकित्सक, पुणे.
५) अधिक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा, पुणे.
६) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखारीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
७) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
८) डॉ. भावना मोहन अडतानी, वैद्यकीय अधिकारी, यांना
(उपसंचालक, आरोग्य सेवा पुणे मंडळ, पुणे यांचे मार्फत)
९) निवडनस्ती सेवा-३.